International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 35 March – April - 2026

# आधुनिक मराठी बालसाहित्य बालकादंबरीतील मूल्यविचार

**डॉ. अशोक शंकरराव लिंबेकर[1], सौ.कामिनी कपिल थोरात[2]**

*[1]मार्गदर्शक, मराठी विभाग प्रमुख, संगमनेर नगरपालिका कला, दा.ज.मालपाणी वाणिज्यब.ना.सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर*

*[2]अभ्यासक, नारायणगाव, ता.जुन्नर, जि. पुणे*

*Corresponding Author – डॉ. अशोक शंकरराव लिंबेकर*

**DOI - 10.5281/zenodo.20485943**

**प्रस्तावना**:

बालकांना आनंद देणारे बालसाहित्य म्हणजे बालकविता, बालकथा, बालनाट्य, बालक कादंबरी, माहितीपर लेखन होय. बालसाहित्यातून जसे बालकांना आनंद मिळतो तसेच उत्तम संस्काराचे साधन म्हणून देखील बालसाहित्याकडे पाहिले जाते .

काळाबरोबर बालसाहित्यामध्ये देखील बदल होत जातात. बालसाहित्यामध्ये मुलांचे भावविश्व चित्रित केले जाते. त्यासोबतच त्यांच्यामध्ये चांगल्या वाईताची जाणीव निर्माण करण्याचे काम होत असते. मनोरंजन, ज्ञानार्जन , भाषा विकास, संस्कृती व परंपरांची ओळख, कल्पनाशक्ती व सर्जनशीलतेला वाव, समाज प्रबोधन, व्यक्तिमत्व विकास  ही सर्व बालसाहित्याची उद्दिष्टे आहेत. या सर्व उद्दिष्टांबरोबरच बालसाहित्य संस्कारांचे बीज रुजवण्याचे काम करत असते.

**बालसाहित्यातील बालकादंबरीचे स्थान:**

बालकादंबरी हा बालसाहित्यातील एक महत्त्वाचा साहित्यप्रकार आहे. बाल कादंबरीची रचना ही दीर्घ स्वरूपाची असते. छोट्या छोट्या कथानंतर मुलांना गुंतवून ठेवण्यासाठी घटनांचा मोठा क्रम आवश्यक असतो. त्यांची ही गरज बालकादंबऱ्यांच्या माध्यमातून पूर्ण होत असते. बालकादंबरीतून मुलांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळत असतो. “बालकादंबरी हा मुलांना समजून देण्याच्या प्रयत्नांचा एक प्रभावी लेखन प्रकार आहे कारण नव्या पिढीच्या बालमित्रांची कल्पनाशक्तीची पातळी गेल्या पिढीतील बालवाचकांच्यापेक्षा खूप बदललेली आहे. असे जाणवण्यासारखी परिस्थिती आहे.”[१] त्यामुळे मुलांना गुंतवून ठेवत असतानाच बालकादंबरी मुलांवर संस्कार रुजवण्याचे कामही करत जाते.

**बालकादंबरीचे स्वरूप:**

बाल कादंबरीचे स्वरूप हे पुढील मुद्द्यांच्या साह्याने स्पष्ट करता येईल .

- **पात्रे:** बालक कादंबरीतील पात्रे ही मोठ्यांच्या कादंबरी प्रमाणे मनोविश्लेषणात्मक दृष्ट्या क्लिष्ट व गुंतागुंतीची नसतात तर ती सरळ सोपी व आकलनीय असतात. शक्यतो या कादंबऱ्यांचे नायक नायिका ही लहान मुलेच असतात. बऱ्याचदा प्राणीपात्रेही बालकादंबरीत पहावयास मिळतात. बालकादंबरीतील पात्रे ही बालकांच्या भावविश्वाशी एकरूप होतील अशी असतात.

- **बालकादंबरीतील वातावरण:** कोणत्याही साहित्याचे वातावरण हे संस्कृती व परिसराची ओळख घडून देत असते. “वातावरणातून कादंबरीच्या परिवेशाची कल्पना येणे हा वातावरण निर्मिती मागचा प्राथमिक उद्देश असतो. एखाद्या कादंबरीतल्या घराचे वर्णन देखील त्या कादंबरीतील व्यक्तीच्या स्वभावावर व त्याचप्रमाणे सामाजिक सांस्कृतिक संदर्भावरही प्रकाश टाकू शकते.”[२] हे वातावरण मुलांना त्यांच्या स्वतःच्या भावविश्वात रममाण करणारे असते.
- **भाषाशैली:** बालकादंबरीची भाषा अत्यंत साधी व सोपी असते. कुठेही गुंतागुंतीच्या भाषेचा वापर केला जात नाही. मुळातच मुलांना द्वयर्थी बोलणे, तिरकस बोलणे या गोष्टी लक्षात येत नाही त्यामुळे सरळ सोप्या भाषेमध्ये बालकादंबरी लेखन केले गेलेले दिसते .
- **निवेदन:** बालकादंबरीचे निवेदनही बऱ्याचदा तृतीय पुरुषी असते. एखादी गोष्ट मुलांना कुणीतरी सांगते आहे अशा पद्धतीने निवेदन असल्यामुळे घटनेचे स्पष्टपणे वर्णन करता येते. निवेदनाची गती देखील योग्य असणे येथे अपरिहार्य आहे कारण लहान मुलांची उत्कंठा वेळेत शमणे आवश्यक असते. पाल्हाळ लावण्याप्रमाणे मांडणी केल्यास मुले कंटाळतात कारण त्यांचे मन चंचल आणि एकाग्रता कमी असते. त्यामुळेच अतिशय कमी वेळात केलेले प्रभावी निवेदन बालकादंबरीची योग्यता ठरवत असते.

**बाल कादंबरीचे प्रकार:**

बालकादंबरीचे पुढीलप्रमाणे प्रकार आहेत .

**बालकादंबरीची वाटचाल:**

मराठी बालसाहित्यामध्ये बालकादंबरीकडे पाहिले असता खऱ्या अर्थाने बालकादंबरीचे लेखन १९३० नंतर उदयाला आले आणि नंतर या साहित्य प्रकाराची मुळे हळूहळू रुजत गेली. या अगोदर बालवाङ्मयाला स्वतंत्र असा दर्जा विसाव्या शतकाच्या सुरुवातीला मिळू लागला. इ.स.१९३० नंतर गोपीनाथ तळवलकर, साने गुरुजी, ना.धो. ताम्हणकर, वि.वि.बोकील, मालतीबाई दांडेकर, भा.रा. भागवत, सुधाकर प्रभू, यदुनाथ थत्ते अशा लेखकांच्या लेखनाने बालक कादंबरीचे दालन समृद्ध होत गेले.

सुरुवातीला व्यक्तीप्रधान कादंबऱ्यांमध्ये गुंतून पडलेली मराठी बालकादंबरी ही नंतर सामाजिक बालकादंबरीकडे वळलेली दिसते. ना.धो. ताम्हणकर यांची गोट्या, चिंगी, वि.वि.बोकील यांची वसंत, विजय, लाडका राजा तर श्री.श. खानविलकर यांचा चंदू, वि.वि. पेठकर यांची किशोर, शांतीलाल भंडारी यांची टिल्लू, मालतीबाई दांडेकर यांची अष्टपैलू प्रमोद अशा अनेक व्यक्ती प्रधान बालकादंबऱ्या मराठी साहित्यात पाहायला मिळतात.

सोबतच यदुनाथ थत्ते यांचे वाळवंटातील झरे, भा.रा. भागवत यांची खजिन्याचा शोध, कॅप्टन किडचा खजिना, साने गुरुजींची श्यामची आई, धडपडणारी मुले या सामाजिक विषयावरील बालक कादंबऱ्यांचे लेखनही मराठी साहित्यात दिसून येते.

आधुनिक बालसाहित्यामध्ये बालकादंबरीचे एक स्वतंत्र स्थान निर्माण झाले आहे. सुरुवातीला खूपच थोड्या प्रमाणात बालकादंबरीच्या क्षेत्रात लेखन केले गेले होते बालसाहित्यामध्ये बालकविता व बालकथा यांचे लेखन विपुल प्रमाणात आढळते. मात्र आता बालकादंबरीचे लेखनही विस्तारत गेल्याचे लक्षात येते. दिलीप प्रभावळकर यांचा बोक्या सातबंडे , ज्ञानदा नाईक यांच्या तेरेखोल, बाबी पत्रकार होते, रुप्या बुरुज आणि धाडसी चमू , रेखा बैजल यांची प्रकाशाची फुले, बाबा भांड यांच्या धर्मा , एका

चपलेची गोष्ट , सुधाकर प्रभू यांची चार्ल्स रुडॉल्फ, वृक्ष मित्र जांभेश्वर, संगीता बर्वे यांची पियूची वही, झिपरू ,सुनिता राजे पवार कांडा, लीला दीक्षित यांचा बहादूर बल्लू , बहादुर बल्लू परत येतोय संजय ऐलवाड यांची वारूळ यांसारख्या अनेक बालकादंबऱ्यांचे लेखन झाले आहे.

**बालक कादंबरीतील मूल्यविचार:**

बालकादंबरीमध्ये एकाच वेळी विविध प्रकारची मूल्य दिसून येतात. यापैकी सामाजिक मूल्ये, नैतिक मूल्ये, शाश्वत जीवनमूल्ये, आधुनिक जीवनमूल्ये, सांस्कृतिक जीवनमूल्ये अशा अनेक प्रकारात या मूल्य विचारांची विभागणी होते.

- **सामाजिक मूल्ये:** बहुतांश कादंबऱ्यांमध्ये 'स्वातंत्र्य' या जीवन मूल्याचा विचार केला आहे. लहान मुलांची मुळातच प्रवृत्ती स्वतंत्र विचारांची असते. त्यांना बांधून ठेवलेले आवडत नाही. अनेक बालकादंबऱ्यांमध्ये कुणाला तरी बांधून ठेवण्याचे वर्णन येते अशावेळी कादंबरी नायक या गोष्टीचा विरोध करतात. बोक्या सातबंडे मध्ये संगीता नावाच्या छोट्या मुलीला शिक्षण देतो म्हणून गावाकडून घेऊन आलेले हंगामे कुटुंब बंदीवासात टाकते. बोक्या व त्याचे मित्र बोक्याच्या कुटुंबाच्या मदतीने तिला तिठून सोडवतात आणि तिच्या स्वतःच्या घरी सुखरूप पोहोचवतात . जेव्हा बोक्याला संगीता सांगते तिला हंगामे शिक्षण घेण्यासाठी घेऊन आले आहे यावर बोक्याचा मित्र संदीप पटकन तीव्र प्रतिक्रिया देतो, "आणि हे तुला गुलामसारखं वागवतायेत."[३] यातूनच मुलांना स्वातंत्र्य म्हणजे काय हे समजत असते हे लक्षात येते. बोक्या सातबंडे या कादंबरीच्या पाचव्या भागात सुद्धा किसन नावाच्या मुलाला चावरे काका काकू त्याच्या घरातून पळवून आणतात . त्याच्या संपत्तीच्या लोभापाई ते त्याला कोंडून ठेवतात ही गोष्ट बोक्याच्या लक्षात आल्यावर तो आपल्या कुटुंबाच्या मदतीने किसनला सोडवून आणतो.

'समता' हे सामाजिक मूल्य बहुतांश कादंबऱ्यांमध्ये पाहायला मिळते. लहान मुलांमध्ये कोणत्याही स्वरूपाचे भेजा देत नसतात उलट मोठी माणसे हे भेदाभेद पाळत असतात थोड्याफार प्रमाणात लहान मुले मोठ्यांचे ऐकून हे असमानतेचे धडे गिरवतात अशावेळी बालकादंबरीतून समता हे मूल्य रुजवण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. रेखा बैजल यांच्या प्रकाशाची फुले या बालकादंबरीमध्ये अशाच पद्धतीने समता मूल्य दिसून येते . राजू आणि चारू या दोन मित्रांची ही गोष्ट आहे . चारु अनाथ असल्यामुळे त्याला कोणीही जवळ करत नसते अगदी राजूची आजीसुद्धा तो कोण कुठला कोणत्या जातीचा असेल असा विचार घेऊन त्याच्याशी भेदभावाने वागत असते मात्र राजू आणि त्याचे आई -वडील चारूचा चांगुलपणा ओळखून त्याला स्वीकारतात आणि त्याला आपल्या कुटुंबात स्थान देतात. यासोबतच 'देश जोडण्याचा खेळ' या देविदास फुलारी यांच्या बालकादंबरी बंधुता हे मूल्य आपणास पहावयास मिळते. तथागत, जरीना, सुदाम हे वेगवेगळ्या धर्माची मुले एकमेकांचे अगदी जवळचे मित्र- मैत्रिणी असतात आणि ही मुले स्वतः तर बंद होते आणि वागतातच पण इतरांनाही बंधुभाव शिकवतात .

- **नैतिक मूल्य:** इ.स.१९९७ पासून महाराष्ट्र शासनाने अभ्यासक्रमामध्ये मुल्यांचा समावेश केला यासाठी दहा नैतिक मूल्यांचा अंतर्भाव अभ्यासक्रम करण्यात आला. यातील काही मूल्ये देखील आपल्याला बालकादंबरीमध्ये पहावयास मिळतात.

'संवेदनशीलता' हे मूल्य बऱ्याच कादंबऱ्यांमध्ये आपणास पहावयास मिळते. इतरांच्या दुःखाचा विचार

करून दुःख दूर करण्यासाठी या बालकादंबऱ्यांमधील नायक नायिका प्रयत्न करतात. सुरेखा शहा यांच्या 'नवी पहाट' या बालकादंबरीमध्ये मुले भूकंपामध्ये स्वतःचे घरदार कुटुंब गमावतात मात्र संवेदनशीलतेमुळेच समाजातील अनेक घटक या पोरक्या मुलांना आधार देतात. इतकेच नव्हे तर ही सर्व मुले एकमेकांनाही आधार देतात आणि खंबीरपणे उभे राहून स्वतःचा नवा मार्ग निर्माण करतात.

यासोबतच 'सौजन्यशीलता' हा गुण देखील या बालकादंबरीच्या नायकांमध्ये पाहायला मिळतो. बहादूर बल्लू, बोक्या, बाबी या नायकांसोबतच इतर मुलांमध्येही सौजन्यशीलता दिसते. इतरांशी बोलताना मुले अत्यंत सौजन्यशीलतेने बोलतात .

'राष्ट्रभक्ती' हे एक नैतिक मूल्य आहे. "राष्ट्रभक्ती म्हणजे राष्ट्र विषयी नितांत प्रेम मीरा पवार पुज्य भाव निष्ठा व समर्पण भाव होय."[४] ज्ञानदा नाईक यांच्या तेरेखोल सारख्या कादंबरीचे विषय स्वातंत्र्यलढा आहे. सुरेखा पानंदीकर यांची 'बोरीचा पूल' व 'तेरेखोल' या दोन्ही कादंबऱ्या गोवा मुक्ती संग्रामातील घटनांवर असल्याकारणाने राष्ट्रासाठी काहीही करण्याची तयारी अगदी प्राणांचे बलिदान देण्याची मानसिकता देखील वर्णन केली आहे. यासारख्या इतरही कादंबऱ्या राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता ही नैतिक मूल्य दिसतात.

'बाबा भांड यांच्या 'धर्मा', 'गोष्टी एका चपलेची' यांसारख्या कादंबऱ्यांतून श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व समजून दिले आहे. तर स्त्री पुरुष समानता सुद्धा बालकादंबऱ्यांमध्ये दिसून येते 'अखेर पिंकी सापडली' या सुनीती वाघ यांच्या बालकादंबरीत मुली आहेत म्हणून त्यांना जपून वागवायचे, दूरच्या शाळेत पाठवायचे नाही हा विचार त्यांचे छोटे छोटे भाऊ खोडून काढतात. आम्ही आमच्या बहिणींचे रक्षण करू असे सांगतात पण अखेर सर्व प्रसंगांचा अनुभव घेतल्यावर मुलींनीही आत्म संरक्षणासाठी तयार असावे असा संदेश देतात. काही बालकादंबरी मध्ये नायक नसून मुख्य भूमिकेत नायिका असलेल्या मुली आहेत म्हणजेच येथेही स्त्री पुरुष समानता पहावयास मिळते.

बालकादंबऱ्यांमध्ये लहान मुले अनेक गोष्टींचे तार्किक विचार करून संबंध लावतात. मोठ्या माणसांनी सांगितलेल्या गोष्टींवर ते अंधपणे विश्वास ठेवत नाही तर स्वतः त्या गोष्टी शोधून पाहतात. रहस्य प्रधान कादंबऱ्यांमध्ये ही गोष्ट जास्तीत जास्त दिसून येते. ज्ञानदा नाईक यांची बाबी समुद्र किनाऱ्यावर राक्षस दिसला या गोष्टीवर विश्वास न ठेवता स्वतः ही गोष्ट पडताळून पाहायला जाते आणि तस्करांची टोळी पकडून देते या अशाच पद्धतीने बहादूर बल्लू सुद्धा अंधविश्वास न ठेवता चोरांनी पसरवलेल्या अफवांकडे दुर्लक्ष करून सत्य शोधण्याचा प्रयत्न करतो आणि शेवटी चोरांची टोळी पकडून देतो.

- **शाश्वत जीवनमूल्ये:** बालकादंबरींमधून शाश्वत जीवनमूल्ये देखील दर्शवली आहेत. शाश्वत मूल्ये म्हणजे अशी जीवामूल्ये जी कधीही कालबाह्य ठरत नाही. प्रत्येक समाजात अनंत काळापासून ती मोलाची असतात यामध्ये सत्य, अहिंसा, स्वावलंबन, कर्तव्यनिष्ठा, क्षमाशीलता ही मूल्य येतात.

बालकादंबरीतून 'सत्य' या मूल्याचे महत्त्व सांगितले आहे. बोक्यासारखा मुलगा आपल्या उपद्व्यापासून इतरांना मदत करतो पण हे करत असताना प्रसंगी त्याला चलाखीही ही करावी लागते. ही चालाखी म्हणजे त्याचे खोटे बोलणे नाही. बोक्या गोष्टी घडून गेल्यावर प्रामाणिकपणे सर्वांकडे त्या कबूल करतो. खरे बोलणे ही गोष्ट चांगली आहे याची लहान मुलांना जाणीव असते मात्र बऱ्याचदा काही प्रलोभनामुळे किंवा भीती पोटी लहान मुले खोटं बोलत असतात. स्वतःच्या वागण्यातून सत्य बोलण्याची गरज समजावून देतात कोणतेही प्रलोभन किंवा भीती खोटं बोलायला लावत असेल तर आपले

वागणे चुकीचेच आहे ही जाणीव वाचकाच्या मनात निर्माण झाल्या वाचून राहत नाही.

बालकादंबरीच्या माध्यमातून मुलांना स्वावलंबनाचे महत्त्वही पटवून दिले जाते. 'बाबा भांड' यांची 'धर्मा' कादंबरी स्वावलंबन शिकवून जाते. याशिवाय बालकादंबरीतील अनेक लहान मुलांची पात्रे स्वतःचे काम स्वतःच करत असतात या जाणिवेतून बालवाचकाच्या मनात स्वावलंबनाचे बीज पेरले जाऊ शकते.

लहान मुल स्वतःच क्षमाशील असते म्हणूनच बालकादंबरीमध्ये चुकीचे वागणाऱ्या लोकांनाही मुले पटकन क्षमा करतात. चुकीचे वागणारे मित्र किंवा मोठे माणसे यांना मुलांकडून लगेचच क्षमा केली जाते. हीच गोष्ट या कादंबऱ्यांच्या कथानकतही दिसून येते. आपल्या वर्तनातूनही पात्रे इतरांना क्षमा करताना आपल्याला दिसतात. 'रुप्या बुरुज आणि धाडसी चमू' या बालकादंबरीमध्ये लक्षी बरोबर इतर मुले आणि बाबी सुद्धा वाईट वागते पण लक्षी या सगळ्या गोष्टी बाजूला ठेवून बाबीला मदत करायला येते. बाबीला पकडण्याचे काम लक्षीच्या वडीलांनी केलेले आहे हे जरी इतरांना ठाऊक असले तरी सर्व मुले लक्षीची मदत घ्यायला तयार होतात. बाबा भांड यांच्या 'एका चपलेची गोष्ट' मध्ये धर्माला चहावाले काका क्षमा करायला सांगतात. कुत्र्याने चप्पल चावली म्हणून तू त्याला मारलस पण तुझ्या दगड मारण्याने तुझी चप्पल परत मिळाली का हे समजावून सांगतात यातूनच क्षमाशीलता पटवून देता येते.

- **आधुनिक जीवनमूल्य:** आधुनिक परिस्थितीनुसार जगण्यासाठी काही नीती मूल्यांची आवश्यकता असते अशा नीती मूल्यांना आधुनिक मूल्य म्हणतात. स्वातंत्र्य समता संवेदनशीलता यासोबतच वैज्ञानिक दृष्टिकोन, स्त्री पुरुष समानता, पर्यावरण संवर्धन, नवीन तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर यांसारखी नीती मूल्य आधुनिक जगात मानवी व्यवहारासाठी निकडीचे आहे.

पर्यावरण संवर्धनासारखे नीतीमूल्ये आपणास बालकादंबऱ्यांमध्ये पहावयास मिळते. निसर्ग आणि लहान मुले यांचे घट्ट नाते आहे. निसर्गासोबतच प्राण्यांशीही लहान मुलांची लवकर गट्टी जमते. सलीम सरदार मुल्ला यांची 'जंगल खजिन्याचा शोध' , 'बहादुर बल्लू' , 'चिन्ना' यांसारख्या बालकादंबऱ्यांमधून पर्यावरण संवर्धनासाठी मुलांनी केलेले उपाय व दिलेला लढा आपल्याला दिसतो.

'www निबिड अरण्य डॉट कॉम या हरिकृष्ण देवसरे यांच्या बालकादंबरीत योग्य वापर कसा करायचा शिवाय चुकीच्या वापरामुळे कोणते अनिष्ट घडू शकते याविषयी विवेचन आले आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर विकास घडवून आणू शकतो तर चुकीचा वापर आपल्याच लोकांना अडचणीत आणू शकतो याविषयीचे प्रसंग या कादंबरीत येतातबा.

**बालकादंबरीतील मूल्यांचा बालवाचकांवर होणारा परिणाम:**

बालकादंबरीमध्ये वर सांगितल्याप्रमाणे मूल्यविचार येत असतात. या मूल्यांचा बालवाचकाच्या मनावर खोलवर परिणाम होतो. बालवाचकांना चांगल्या वाईटाची जाणीव निर्माण होते. कोणत्या गोष्टी वर्तनामध्ये आवश्यक असतात याचे मार्गदर्शन देखील वाचनातून होते. आत्मविश्वास निर्माण होतो. छोट्या छोट्या गोष्टींमध्ये निर्णय घेण्याची क्षमता निर्माण होते. बालकादंबरीतील दीर्घ वाचनाने एकाग्रताही वाढत जाते. विकासाच्या मुख्य टप्प्यावर बालकादंबरीतील पात्रे स्वतःचे वर्तन व उपदेश या दोघांच्या माध्यमातून खोलवर संस्कार करत जातात. बालवाचकांचे संवेदनशील मन प्रगल्भ होत जाते आणि

संस्काराने समृद्ध होत जाते. "सर्वच पुस्तकातून स्पष्टपणे 'घेण्यासारखे' काही चांगल्या- वाईटाचा नियम देणारे मूल्यविवेचक दर्शविणारे असतेच असे नाही. पण जगण्याला आवश्यक अशा प्रयत्नशीलता, उद्योगशीलता, चिकाटी, जिद्द , विधायक प्रवृत्ती या वृत्तीचा अप्रत्यक्ष खोलवर संस्कार आपोआप रुजतो."[५]

थोडक्यात बालकादंबरीतील मूल्य कळत नकळत बालवाचकाच्या मनावर खोलवर परिणाम करतात आणि यातूनच मूल्य संस्कार घडत जातात

**संदर्भ:**


१. देशपांडे अरुण , बालसाहित्य : मराठवाड्याचे नवे स्वरूप नव्या वाटा ,साकेत प्रकाशन औरंगाबाद , २००९,पृ.२३.

२. डॉ.सौ. सारडा निर्मला , बालसाहित्य स्वरूप आणि व्याप्ती , संपा. डॉ.उज्ज्वला मेहेंदळे , मुंबई मराठी साहित्य संघ ,२०२१ , पृ.३७.

३. प्रभावळकर दिलीप ,बोक्या सातबंडे भाग २ ,राजहंस प्रकाशन ,पुणे ,तेविसावी आवृत्ती,२०२३ , पृ. २२

४. प्रा.डॉ.पाटील लीला , मूल्यशिक्षण विचारधन , ऋचा प्रकाशन , नागपूर , द्वितीय आवृत्ती २०१२, पृ.३७.

५. वसेकर विश्वास ,बालसाहित्याचे अंतरंग , यशोदीप प्रकाशन पुणे , २०१९ ,पृ १४ .